(५८)

(१३)

ग्राम पंचायतमार्फत जन्म, मृत्यू आणि विवाह नोंदणी.

महाराष्ट्र शासन,
ग्राम विकास विभाग,
परिपत्रक क्रमांक-व्हीपीएम्-१९६९-४०५५७-ई,
सचिवालय, मुंबई-३२, दिनांक १९ जानेवारी १९७०

पहा:- (१) शासन निर्णय, ग्राम विकास विभाग, क्रमांक-व्हीपीएम्-१९६८-३०३९०-ई, दिनांक २१ डिसेंबर १९६८.
(२) जिल्हाधिकारी, अकोला यांचे क्रमांक-२०८०-अ-१ (२)-६९, दिनांक २२ सप्टेंबर १९६९ चे पत्र.

परिपत्रक
----------

शासन निर्णय क्रमांक-व्हीपीएम्-१९६८-३०३९०-ई, दिनांक २१ डिसेंबर १९६८ अन्वये खेड्यांतील जन्म, मृत्यू आणि विवाह नोंदणीचे काम पूर्वी तलाठी, पोलीस पाटील यांचे मार्फत होत असे. ते काम त्यांच्याकडून काढून दिनांक १ एप्रिल १९६९ पासून ग्राम पंचायतीकडे सोपविण्यांत आले. जन्म, मृत्यू व विवाह यासंबंधीचे दिनांक १ एप्रिल १९६९ पूर्वीचे रेकॉर्ड पंचायतीकडे द्यावयाचे किंवा कसे असा प्रश्न उपस्थित झाला आहे. याबाबत शासन आदेश देत आहे की, दिनांक १ एप्रिल १९६९ पूर्वीचे रेकॉर्ड तहशील कार्यालयांतच ठेवण्यांत यावे. दिनांक १ एप्रिल १९६९ पासूनचे रेकॉर्ड ग्रामपंचायत कार्यालयात राहील.

२. हे परिपत्रक महसूल व वन विभागाशी सल्लामसलत करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

द. वि. साळरकर,
अवर सचिव, महाराष्ट्र शासन,
ग्राम विकास विभाग.

प्रत -

सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,

शामम्नु-रोटा-एव्ह-११८६(१०००-१-७०)

(कृ.मा.प.)